महाराष्ट्रातील निवडणुकीय राजकारणातील मैलाचा दगड

# राजकीय अर्थकारण





संपादक

डॉ. प्रकाश पवार

राजकीय अर्थकारण
संपादक : डॉ. प्रकाश पवार

Rajkiya Arthakaran
Edited by Dr. Prakash Pawar

पहिली आवृत्ती : ऑक्टोबर, २०१७

ISBN 978-93-86401-25-0

© डायमंड पब्लिकेशन्स, २०१७

मुखपृष्ठ
शाम भालेकर

अक्षरजुळणी
डायमंड पब्लिकेशन्स

मुद्रक
स्टार कॉपिअर्स प्रा. लि. पुणे

प्रकाशक
डायमंड पब्लिकेशन्स
२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट
ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२
info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या
www.diamondbookspune.com

प्रमुख वितरक
डायमंड बुक डेपो
६६१ नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक
पुणे-४११ ०३० ☎ ०२०-२४४८०६७७

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# अनुक्रम


- मनोगत — तीन
- विभाग १ – राजकीय अर्थकारण – नवहिंदुत्व जाणीव — १

१. संघटित राजकीय प्रक्रिया व लोकशाही — ३–१८
   – डॉ. प्रकाश पवार

२. कृषी औद्योगिक समाज प्रतिमान — १९–२८
   – डॉ. अशोक चौसाळकर

३. द्विक्षेत्रीय विकासाचे प्रतिमान — २९–४०
   – डॉ. जे. एफ. पाटील

४. एकविसाव्या शतकाच्या आरंभीचे महाराष्ट्राचे राजकीय अर्थकारण — ४१–६५
   – डॉ. प्रकाश पवार

५. दलित वर्गात समरसतेची राजकीय क्रांती — ६६–७६
   – डॉ. प्रकाश पवार

६. एकविसाव्या शतकातील राजकीय नवहिंदुत्व — ७७–९०
   – डॉ. प्रकाश पवार

- विभाग २ – ग्रामीण राजकारण — ९१

७. ग्रामीण राजकीय अभिजनांचे बदलते स्वरूप — ९२–१०६
   – राजकुमार सुरवसे

८. कोकण विभाग : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक — १०७–१२६
   – श्रावण पाटील

९. उत्तर महाराष्ट्र : जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे राजकारण — १२७–१३९
   – सचिन मरळे

१०. पश्चिम विदर्भ : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक — १४०–१५३
   – मोहन कांबळे

११. पूर्व विदर्भ : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक — १५४–१७२
   – शीतल पाटील

१२. मराठवाडा : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक — १७३–२००
   – सूर्यकांत गायकवाड

१३. हिंगोली जिल्हा परिषद निवडणूक — २०१–२०५
   – डॉ. विशाल पतंगे

१४. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण — २०६–२२४
   – सचिन भोसले

१५. ग्रामीण राजकारणात महिलांची भागीदारी — २२५–२३२
   – डॉ. वैशाली पवार

- विभाग ३ – शहरी राजकारण — २३३

१६. नगरपालिका व नगर पंचायत निवडणूक — २३४–२४६
   – डॉ. प्रकाश पवार

१७. सोलापूर महानगरपालिकेतील सत्तांतर — २४७–२६२
   – प्रा. संगमेश्वर नीला

१८. लातूर महानगरपालिका निवडणुकीचा परामर्श — २६३–२६९
   – प्रमोद शिंदे, सुनील शिंदे

१९. परभणी महानगरपालिका निवडणूक — २७०–२८२
   – सुरेश भालेराव, सुनील शिंदे

# ११

# पूर्व विदर्भ : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक

शीतल पाटील

केंद्राच्या आणि राज्याच्या राजकारणातील पक्षीय स्पर्धेमुळे राजकारणात अदलाबदल होते. यामधून राजकारणाचे नवे आयाम नेहमीच पुढे येत असतात. यासाठी राज्याच्या निवडणुका नेहमीच महत्त्वाच्या ठरल्या आहेत. स्थानिक शासन संस्थांच्या या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील स्थानिक राजकारणात मोठा बदल झालेला दिसून येतो. महिला, जातीनुसार वर्गवारी, आरक्षण, जाहिरातींचा वाढता प्रभाव, पक्षांतर, पक्षांतर्गत बंडाळी, नेतृत्वाचा प्रभाव इत्यादी सर्व मुद्द्यांच्या प्रभावामधून जनतेच्या वाढलेल्या अपेक्षा अशा विविध मुद्द्यांआधारे या स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुका महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहेत.

पूर्व विदर्भ हा नागपूर प्रशासकीय विभागामध्ये समाविष्ट होणारा विभाग आहे. या विभागामध्ये प्रामुख्याने नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली अशा सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. वरील जिल्ह्यांपैकी गडचिरोली जिल्हा आदिवासींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. वरील सहा जिल्ह्यांपैकी वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर या तीन जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या निकालावरून सत्तेची नवी समीकरणे घडली. त्याचबरोबर या निवडणुकांमध्ये चर्चेचा मुद्दा राहिला तो प्रचाराचा. प्रचाराच्या वेळी भाजपने विशेष भूमिका निभावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने शहरी भागात विशेष प्रचाराची कामगिरी केली. इतर राजकीय पक्षांच्या तुलनेत भाजप पक्षाने प्रचारावर अधिक जोर दिला होता. राज्यामधील आपले कार्य आणि स्थानिक नेते यापेक्षा केंद्रातील प्रतिमा भाजप पक्षाने अधिकाधिक पुढे केलेल्या आहेत. केंद्रातील प्रतिमांबरोबर जाहिरातींवरदेखील अवाढव्य खर्च केला गेला. त्यामुळे या स्थानिक निवडणुकींना विधानसभेच्या निवडणुकांचे स्वरूप प्राप्त झाले असल्याचे वाटत होते.



तक्ता क्र.१ : नागपूर विभागातील जिल्हा परिषद निवडणूक

| अ.क्र. | जिल्हा | एकूण जागा | एकूण उमेदवार | बसपा | भाजप | काँग्रेस | रा.काँ. | शिव सेना | मनसे | इतर | अपक्ष | एकूण निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ५२ | ३०३ | ०२ | ३१ (१८) | १३ (१६) | ०२ (०८) | ०२ (१) | ० | ० (८) | २ | ५२ |
| २ | चंद्रपूर | ५६ | ३१५ | ० | ३३ (१८) | २० (२१) | ० (७) | ० (२) | १ | ० (९) | ३ | ५६ |
| ३ | गडचिरोली | ५१ | २६४ | ० | २० (०९) | १५ (१३) | ५ (१०) | ० (२) | ० | २ (१६) | २ | ५१ |
| | एकूण | १५९ | ८८२ | ०२ | ८४ | ४८ | ०७ | ०२ | ० | ०२ | १४ | १५९ |

(संदर्भ - mahades.maharashtra.gov.in)

(टीप - कंसात २०१२च्या निवडणुकीतील आकडेवारी दर्शविलेली आहे.)

नागपूर विभागातील वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीन जिल्हा परिषदांच्या निवडणूक निकालांमध्ये भाजप हा पक्ष सर्वांत जास्त जागा मिळवणारा पक्ष ठरला. वर्धा जिल्हा परिषदेमध्ये एकूण ५२ जागांकरिता ३०३ उमेदवारांमध्ये लढत झाली. यामध्ये ३१ जागा मिळविणारा भाजप पक्ष प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला. मागील निवडणुकीच्या वेळी वर्धा जिल्हा परिषदेवर १८ जागा मिळविणाऱ्या भाजप पक्षाने यावेळी ३१ जागांवर आघाडी घेतली. १३ जागा मिळवून काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. २०१२च्या निवडणुकीत १६ जागा मिळवलेल्या काँग्रेस पक्षाने या निवडणुकीत काही फरकाने १३ जागा मिळवत आपली जागा स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला. २०१२च्या निवडणुकीत भाजप आणि काँग्रेस यामध्ये केवळ दोन जागांचा फरक असताना यावेळी मात्र भाजपने मोठे यश संपादन केले. त्याचबरोबर बसपा २ आणि शिवसेना २, अपक्ष २ अशा जागा मिळाल्या. वर्धा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सर्वाधिक फटका राष्ट्रवादी काँग्रेसला बसला. २०१२च्या निवडणुकीमध्ये ८ जागा मिळवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला या निवडणुकीत केवळ २ जागा मिळवता आल्या. काँग्रेसलाही काही प्रमाणात अपयश मिळाले. भाजपला मात्र चांगले यश संपादन करता आले.

चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये एकूण ५६ जागांकरिता ३१५ उमेदवारांमध्ये निवडणूक झाली. यामध्ये भाजप हा पहिल्या पसंती क्रमांकाचा पक्ष ठरला. ३३ जागा मिळवत भाजपने मोठे यश मिळविले. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस राहिला. काँग्रेसला २० जागा मिळवता आल्या. २०१२च्या निवडणुकीत केवळ १८ जागा मिळवणाऱ्या भाजपने या निवडणुकीत ३३ जागा मिळविल्या. १८ जागा मिळवून दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या

भाजपने यावेळी पहिला क्रमांक मिळवला. मागील निवडणुकीत २० जागा मिळवणाऱ्या काँग्रेसने या निवडणुकीत एका फरकाने म्हणजेच २१ जागा मिळवल्या. अपक्षांना ३ जागा मिळवता आल्या. भाजप, काँग्रेस आणि अपक्ष वगळता इतर कोणत्याही पक्षाला एकही जागा मिळवता आली नाही. २०१४च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला ७ जागा होत्या, शिवसेनेला २ आणि इतर ९ होते. या निवडणुकीमध्ये यांना एकही जागा मिळवता आली नाही. या निवडणुकीत भाजपला चांगले यश मिळाले. काँग्रेसला आपले स्थान स्थिर ठेवता आले; राष्ट्रवादी काँग्रेसला मात्र मोठे अपयश स्वीकारावे लागले.

गडचिरोली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही भाजपने मोठे यश मिळविले. एकूण ५१ जागांकरिता झालेल्या निवडणुकीमध्ये २६४ उमेदवारांमध्ये लढत झाली. नक्षलग्रस्त भागात जनतेने भाजपलाच पहिली पसंती दिली. २० जागा मिळवत भाजप हा प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला. २०१२च्या निवडणुकीमध्ये केवळ ९ जागांवर असणाऱ्या भाजप पक्षाने अगदी दुपटीपेक्षाही दोन जागा अधिक अशा २० जागा मिळवल्या. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस पक्ष राहिला. काँग्रेसला १५ जागा मिळवण्यात यश मिळाले. मागील निवडणुकीपेक्षा काँग्रेसची अधिक घसरण झाली नाही. तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेस राहिला. या पक्षाला केवळ ५ जागा मिळवता आल्या. २०१२च्या निवडणुकीच्या तुलनेत ५ जागांची घसरण राष्ट्रवादी काँग्रेसला स्वीकारावी लागली. शिवसेनेला मात्र यावेळी एकही जागा घेता आली नाही.

### चंद्रपूर जिल्हा परिषद

चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांचा पराभव झाला. या जिल्हा परिषदेत लक्षवेधी ठरलेल्या चिंतलधाबा पोसरी क्षेत्रातून काँग्रेसचे विनोद अहिरकर यांचा पराभव झाला. चंदनखेडा मुधोली क्षेत्रातून काँग्रेसचे दिनेश चोखारे यांचाही पराभव झाला. वामनराव गड्डमवार यांच्या कन्या नंदा अलुरवार यांचाही बोधली कवठी या क्षेत्राहून ३३ मतांनी पराभव झाला; तर व्याहाड खुर्द हरंबा क्षेत्रातून काँग्रेसचे दिनेश चिटनुवार यांचाही पराभव झाला. याचबरोबर केमारा–देवाडा क्षेत्रातून काँग्रेसचे प्रकाश पाटील, मारक्कवार यांना अपयश आले. ऊर्जानगरमधून काँग्रेसच्या चित्रा डांगे यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. काँग्रेसमधील वरील सर्व दिग्गज मंडळी गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय राजकारणात असताना यावेळी मात्र मतदारांनी त्यांना नाकारले आहे.

दुसरीकडे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील १० जिल्हा परिषदांतील जागांपैकी पूर्णच जागा जिंकून पंचायत समितीच्या २० पैकी १७ जागा जिंकून यश अधोरेखित केले. भाजपचे हे यश पाहता मुनगंटीवार



यांच्याकडेच याचे श्रेय जाते. गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये तीन तालुक्यात काँग्रेसचा एकही सदस्य नाही. गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये काँग्रेसचा मोठा पराभव झाला आहे. कारंजा, समुद्रपूर, देवळी या तीन तालुक्यांमध्ये काँग्रेसला एकही सदस्य निवडून आणता आलेला नाही.

### घराणेशाही

जिल्हा परिषद सभागृहात गजानन निकम हे स्वतंत्र भारत पक्षाच्या उमेदवारीवर विरूळ जिल्हा परिषद गटातून विजयी झाले होते. यावेळी हा गट महिलांकरिता आरक्षित होता. त्यामुळे गजानन निकम यांच्या पत्नी ज्योती निकम या जिल्हा परिषद विरूळ गटातून अपक्ष उमेदवार म्हणून उतरल्या होत्या, त्या विजयी झाल्या. वायफड गटातून काँग्रेसचे मनोज चांदूरकर जिल्हा परिषद सदस्य म्हणून यापूर्वी निवडून आले होते. यावेळी हा गट महिलांकरिता राखीव होता. त्यामुळे काँग्रेसच्या वतीने सुनीता मनोज चांदूरकर यांना उमेदवारी देण्यात आली होती त्या विजयी झाल्या. अल्लीपूर जिल्हा परिषद गटातून ज्ञानेश्वर ढगे जिल्हा परिषद सदस्य म्हणून विजयी झाले होते. त्यांचा गट महिलांकरिता राखीव झाल्याने काँग्रेसच्या वतीने विभा ज्ञानेश्वर ढगे यांना उमेदवारी दिली होती त्या विजयी झाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व माजी राज्यमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचे अख्खे कुटुंब गडचिरोली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उतरले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून धर्मरावबाबा आत्राम यांच्या ज्येष्ठ कन्या-जिल्हा परिषद माजी अध्यक्ष भाग्यश्री आत्राम हलगेकर यांना सिरोंचा तालुक्याच्या जाफराबाद मतदार संघातून उमेदवारी देण्यात आली होती; तर धाकटी कन्या तनुश्री आत्राम यांना मुलचेरा तालुक्याच्या शांतीग्राम कोठारी जिल्हा परिषद क्षेत्रातून उमेदवारी देण्यात आली होती; तर आणखी एक कन्या नेहा आत्राम यांना अहेरी तालुक्याच्या महागाव देवलअरी मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी देण्यात आली होती. अहेरी तालुक्याच्या रेवनपल्ली उमानूर जिल्हा परिषद क्षेत्रातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून रामेश्वरराव जगनाथराव आत्राम यांना उमेदवारी दिली होती. माजी आमदार राजे सत्यवानराव आत्राम यांचे ते पुतणे आहेत.

### पक्षांतर

पक्षांतर हा मुद्दा निवडणुकीमध्ये नेहमीच चर्चेचा विषय ठरतो. ऐन निवडणुकीच्या वेळी बऱ्याच वेळा पक्षांतर होताना दिसते. अशा वेळी काहींना विजय मिळतो तर काहींना पराभव स्वीकारावा लागतो. वर्धा जिल्हा परिषदेमध्ये राष्ट्रवादीचे संजय शिंदे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व पिंपरी जिल्हा परिषद गणातून ते विजयी झाले. मात्र, भाजपमधून

राष्ट्रवादीत गेलेल्या सुनीता इथापे यांना पराभव स्वीकारावा लागला. काँग्रेसच्या वंदना फटींग यांनी निवडणुकीच्या वेळी भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळविली, पण त्यांनादेखील पराभव स्वीकारावा लागला.

चंद्रपूर जिल्हा परिषद क्षेत्रात राष्ट्रवादीचे नेते अमर बोलडावार भाजपमध्ये गेले होते. त्यांच्या पत्नीला तिथून उमेदवारी मिळाली व त्या विजयी झाल्या. काँग्रेसचे प्रशांत बाम्बोळे यांनी भाजप प्रवेश करून पत्नी शीतलसाठी उमेदवारी मिळवली होती आणि त्याही विजयी झाल्या.

**तक्ता क्र. २ : नागपूर विभागातील पंचायत समिती निवडणूक**

| अ.क्र. | जिल्हा | पंचायत समिती | एकूण संख्या | बसपा | भाजप | काँग्रेस | रा.कॉं. | शिव सेना | इतर | अपक्ष | एकूण निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ८ | १०४ | ०२. | ५९ | २९ | ०४ | ०४ | ० | ०६ | १०४ |
| २ | चंद्रपूर | १५ | ११२ | ० | ७० | ३३ | ०१ | ०४ | ० | ०३ | १११ |
| ३ | गडचिरोली | १२ | १०२ | ० | ४२ | २४ | १२ | ०३ | ०५ | १६ | १०२ |

(संदर्भ - mahades.maharashtra.gov.in)

वरील तक्त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील एकूण ८ पंचायत समितींच्या निवडणुका झाल्या. चंद्रपूर १५ तर गडचिरोली १२ पंचायत समित्यांकरिता निवडणुका झाल्या.

**तक्ता क्र. ३ : वर्धा पंचायत समितीनिहाय पक्षीय बलाबल**

| अ.क्र. | तालुका | भाजप | काँग्रेस | रा. कॉं. | शिवसेना | बसपा | स्वभाप | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | १४ | ०८ | ०३ | - | ०२ | - | ०१ | २८ |
| २ | सेलू | ०६ | ०६ | - | - | - | - | - | १२ |
| ३ | हिंगणघाट | ०७ | ०३ | ०२ | ०१ | - | - | - | १३ |
| ४ | समुद्रपूर | ०८ | - | - | ०३ | - | ०१ | ०१ | १३ |
| ५ | देवळी | ०८ | ०३ | - | - | - | - | ०१ | १२ |
| ६ | आर्वी | ०७ | ०३ | - | - | - | - | ०२ | १२ |
| ७ | कारंजा | ०६ | ०२ | - | - | - | - | - | ०८ |
| ८ | आष्टी | ०४ | ०२ | - | - | - | - | - | ०६ |
| | एकूण | ६० | २७ | ०५ | ०४ | ०२ | ०१ | ०५ | १०४ |



वर्धा जिल्ह्यामध्ये एकूण ८ पंचायत समित्या येतात. वर्धा, सेलू, हिंगणघाट, समुद्रपूर, देवळी, आर्वी, कारंजा, आष्टी या ८ पंचायत समित्यांची निवडणूक झाली. एकेकाळी काँग्रेसचे येथे नियंत्रण होते. मात्र, वरील निकालानुसार भाजपने मोठे यश मिळविले आहे. सर्वच पंचायत समित्यांमध्ये भाजपने एकहाती सत्ता घेतली आहे. वर्धा पंचायत समितीमध्ये मागील वेळी भाजपची सत्ता होती. या वेळीही भाजपने १४ जागा मिळविल्या. तो प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला. सेलू पंचायत समितीमध्ये मागील वेळी भाजपची सत्ता होती. यावेळी भाजप आणि काँग्रेसला समसमान ६ जागा मिळाल्या. हिंगणघाट पंचायत समितीमध्ये पूर्वी राष्ट्रवादीची सत्ता होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ २ जागा मिळवण्यात यश आले. भाजप ७ जागा मिळवत प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस आणि तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेस राहिला.

समुद्रपूर पंचायत समितीमध्ये मागील वेळी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि अपक्षांची सत्ता होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला मागे खेचत भाजपने सर्वाधिक ८ जागा मिळवल्या. राष्ट्रवादीला एकही जागा मिळवता आली नाही. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस आहे. केवळ ३ जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत. देवळी पंचायत समितीमध्ये काँग्रेसची सत्ता होती. यावेळी भाजपने बहुमत प्राप्त केले. काँग्रेसला केवळ ३ जागा मिळाल्या; तर राष्ट्रवादीला एकही जागा मिळाली नाही. आर्वी पंचायत समितीमध्ये यापूर्वी भाजपची सत्ता होती. या वेळीही ती भाजपनेच कायम ठेवली. कारंजा पंचायत समितीमध्ये यापूर्वी काँग्रेसची सत्ता होती. ती उलथून यावेळी भाजपने यश मिळवले. भाजपने ६ जागा मिळवल्या; तर काँग्रेसने २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला एकही जागा मिळवता आली नाही. आष्टी पंचायत समितीमध्ये यापूर्वी भाजपची सत्ता होती. या वेळीही भाजपने आपली सत्ता कायम ठेवली. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस राहिला. त्यांना केवळ २ जागा मिळाल्या आहेत.

## स्त्री–पुरुष वर्गवारी

वर्धा पंचायत समितीमध्ये भाजपचे नियंत्रण दिसते. एकूण आठ पंचायत समित्यांमधील साठ जागा भाजपने जिंकल्या (तक्ता क्र. ३).

**तक्ता क्र. ४ : वर्धा पंचायत समिती स्त्री–पुरुष वर्गवारी**

| अ.क्र. | वर्गवारी | भाजप | काँग्रेस | राष्ट्र. कॉं. | शिवसेना | अपक्ष | बसपा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री | ३४ | १३ | ०३ | ०२ | ०२ | ०१ |
| २ | पुरुष | २६ | १४ | ०२ | ०२ | ०४ | ०१ |
| | एकूण | ६० | २७ | ०५ | ०४ | ०६ | ०२ |

(संदर्भ-epaper.lokmat.com/24/02/2017)

काँग्रेसच्या निवडून आलेल्या ६७ जागांपैकी १८ जागांवर महिला निवडून आल्या; तर भाजपकडून १ पुरुष उमेदवार आणि काँग्रेसकडून १ असे २ मुस्लीम उमेदवार निवडून आले. शिवसेनेकडून ३ महिला उमेदवार, शेतकरी संघटनेकडून १ महिला. अशा प्रकारे सर्वाधिक महिला भाजपमधून निवडून आलेल्या आहेत.

तक्ता क्र.६ : गडचिरोली पंचायत समितीनिहाय पक्षीय बलाबल

| अ.क्र. | तालुका | एकूण | भाजप | काँग्रेस | राष्ट्र. काँ. | अ.वि.सं. | शिवसेना | अपक्ष/इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोरची | ०४ | ०१ | ०२ | - | - | ०१ | - |
| २ | कुरखेडा | १० | ०३ | ०६ | - | - | - | ०१ |
| ३ | देसाईगंज | ०६ | ०६ | - | - | - | - | - |
| ४ | चामोर्शी | १८ | १३ | ०२ | - | - | ०१ | ०२ |
| ५ | गडचिरोली | १० | ०४ | ०४ | - | - | - | ०२ |
| ६ | अहेरी | १२ | ०१ | - | ०३ | ०८ | - | - |
| ७ | एटापल्ली | ०८ | ०१ | ०१ | ०३ | ०२ | - | ०१ |
| ८ | मुलचेरा | ०६ | ०२ | ०२ | ०२ | - | - | - |
| ९ | सिरोंचा | ०८ | ०३ | - | ०३ | ०२ | - | - |
| १० | भामरागड | ०४ | - | - | ०१ | - | - | ०३ |
| ११ | धानोरा | ०८ | ०५ | ०३ | - | - | - | - |
| १२ | आरमोरी | ०८ | ०३ | ०४ | - | - | ०१ | - |
| १३ | एकूण | १०२ | ४२ | २४ | १२ | १२ | ०३ | ०९ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, बुधवार, १ मार्च, २०१७)

गडचिरोली जिल्ह्यातील एकूण १२ पंचायत समित्यांकरिता निवडणुका झाल्या. चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यातील पंचायत समित्यांप्रमाणेच येथेही भाजपने चांगली कामगिरी बजावली. भाजप हा सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष ठरला.-दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष काँग्रेस ठरला. आदिवासी विद्यार्थी संघनेनेदेखील अल्प का असेना काही जागा मिळवण्यात यश मिळवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ ५ जागा जिंकता आल्या.



तक्ता क्र.७ : वर्धा पंचायत समिती सभापती, उपसभापती

| अ.क्र. | पंचायत समिती | सभापती | | पक्ष | उपसभापती | | पक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | महानंदा ताकसांडे | अनु.जाती(म) | भाजप | सुभाष चांभारे | खुला | अपक्ष |
| २ | आर्वी | शीला पवार | खुला (म) | भाजप | धर्मेंद्र राऊत | खुला | भाजप |
| ३ | देवळी | विद्या भुजाडे | खुला (म) | भाजप | किशोर गव्हाळकर | अनु.जाती | भाजप |
| ४ | आष्टी | नीता कोल्हे | खुला (म) | भाजप | हेमलता भगत | ना.मा.प्र.(म) | भाजप |
| ५ | हिंगणघाट | गंगाधर कोल्हे | ओबीसी | भाजप | धनंजय रिठे | खुला | भाजप |
| ६ | कारंजा | मंगेश खवशी | खुला | भाजप | रंजना टिवले | खुला (म) | भाजप |
| ७ | समुद्रपूर | कांचन मडकाम | अनु.जाती (म) | भाजप | योगेश फुसे | ना.मा.प्र. | भाजप |
| ८ | सेलू | जयश्री खोडे | खुला (म) | भाजप | सुनीता उडसर | ना.मा.प्र. | काँग्रेस |

तक्ता क्र.८ : गडचिरोली पंचायत समिती सभापती व उपसभापती यादी

| अ. क्र. | पंचायत समिती | सभापती | | पक्ष | उपसभापती | | पक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोरची | कचरीबाई काटेंगे | अनु.जमाती (म) | काँग्रेस | श्रावणकुमार मतलाम | खुला | काँग्रेस |
| २ | कुरखेडा | गिरीधारी तितराम | अनु.जमाती | काँग्रेस | मनोज उजेदार | ओबीसी | काँग्रेस |
| ३ | देसाईगंज | मोहन गायकवाड | ओबीसी | भाजप | गोपाळ उईके | अनु.जमाती | भाजप |
| ४ | आरमोरी | बबीता उसेंडी | खुला | काँग्रेस | यशवंत सुरपाम | अनु.जमाती | शिवसेना |
| ५ | गडचिरोली | दुर्लभा बांबोळे | अनु.जाती (म) | काँग्रेस | विलास देशमुख | खुला | अपक्ष |
| ६ | चामोर्शी | आनंद भांडेकर | खुला | भाजप | आकुलीबाई विश्वास | खुला (म) | भाजप |
| ७ | धानोरा | अजमन राऊत | अनु.जमाती | भाजप | अनसूया कोडी | अनु.जमाती (म) | भाजप |
| ८ | मुलचेरा | सुवर्णा येमुलवार | ओबीसी (म) | काँग्रेस | बाबू मुजूमदार | खुला | भाजप |
| ९ | एटापल्ली | बेबी पुन्सी लेकामी | अनु.जमाती (म) | रा.काँ. | नितेश नरोटे | अनु.जमाती | अ.वि.सं. |
| १० | सिरोंचा | कमला गावडे | अनु.जमाती (म) | रा.काँ. | रिकुला कृष्णमूर्ती | ओबीसी | अपक्ष |
| ११ | भामरागड | सुखराम मडावी | खुला | अपक्ष | प्रेमिला कुडयामी | अनु.जमाती | अपक्ष |
| १२ | अहेरी | सुरेखा आलाम | अनु.जमाती (म) | अविसं. | राकेश सलाडी | अनु.जमाती | अविसं. |

**तक्ता क्र.९ : चंद्रपूर पंचायत समिती सभापती आणि उपसभापती**

| अ. क्र. | पंचायत समिती | सभापती | | पक्ष | उपसभापती | | पक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बल्लारपूर | गोविंदा पोडे | ओबीसी | भाजप | इंदिरा पिपरे | खुला (म) | काँग्रेस |
| २ | पोंभूर्णा | अलका आत्राम | खुला (म) | भाजप | विनोद देशमुख | ओबीसी | भाजप |
| ३ | चंद्रपूर | वंदना पिंपळशेंडे | खुला (म) | भाजप | चंद्रकांत धोडरे | खुला | भाजप |
| ४ | गोंडपिंपरी | दीपक सातपुते | ओबीसी | भाजप | मनिष वासमवार | अनु.जाती | भाजप |
| ५ | जिवती | सुनील मडावी | अनु.जमाती | भाजप | महेश देवकाते | खुला | भाजप |
| ६ | वरोरा | रोहिणी देवतळे | ओबीसी (म) | भाजप | विजय आत्राम | अनु.जमाती | भाजप |
| ७ | भद्रावती | विद्या कांबळे | अनु.जाती (म) | भाजप | नागोबा बहादे | खुला | अपक्ष |
| ८ | सिंदेवाही | मधुकर मडावी | अनु.जमाती | भाजप | मंदाताई बाळबुधे | खुला (म) | भाजप |
| ९ | ब्रह्मपुरी | प्रणाली मैंद | खुला (म) | भाजप | विलास उरकुडे | खुला | भाजप |
| १० | सावली | छायाताई शेंडे | खुला (म) | भाजप | तुकाराम ठिकरे | खुला | भाजप |
| ११ | चिमूर | विद्या चौधरी | अनु.जमाती (म) | काँग्रेस | शांताराम सलवटकर | अनु.जमाती | काँग्रेस |
| १२ | नागभीड | अरविंद देशमुख | खुला | काँग्रेस | प्रफुल्ल खापर्डे | अनु.जाती | काँग्रेस |
| १३ | कोरपना | श्याम रणदिवे | ओबीसी | काँग्रेस | संभा कोवे | अनु.जमाती | काँग्रेस |
| १४ | राजुरा | कुंदाताई जेणेकर | खुला (म) | काँग्रेस | मुमताज जावेद | खुला (म) | काँग्रेस |

**तक्ता क्र.१० : जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यादी**

| अ. क्र. | जिल्हा परिषद | अध्यक्ष | | पक्ष | उपाध्यक्ष | | पक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर | देवराव भोंगळे | ओबीसी | भाजप | कृष्णा सहारे | खुला | भाजप |
| २ | गडचिरोली | योगिता भांडेकर | खुला (म) | भाजप | अजय कंकडालवार | खुला | आ.वि.सं. |
| ३ | वर्धा | नितीन मडावी | अनु.जमाती | भाजप | कांचन नांदुरे | ओबीसी | भाजप |



**तक्ता क्र.११ : चंद्रपूर जिल्ह्यातील पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची जातनिहाय आकडेवारी**

| अ.क्र. | पक्ष | सर्वसाधारण | | ना.मा.प्र. | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | १२ | १२ | १२ | १० | ०६ | ०७ | ०४ | ०८ | ३४ | ३७ | ७१ |
| २ | काँग्रेस | ०६ | ०४ | ०५ | ०४ | ०१ | ०२ | ०६ | ०५ | १८ | १५ | ३३ |
| ३ | अपक्ष | ०१ | - | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ४ | राष्ट्र. काँग्रेस | - | - | - | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| ५ | शेतकरी संघटना | - | - | ०१ | - | - | ०१ | - | - | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण | १९ | १६ | १८ | १५ | ०७ | १० | १० | १३ | ५४ | ५४ | १०८ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, मार्च १, २०१७)

चंद्रपूर जिल्ह्यातील पंचायत समितीच्या निवडणूक निकालाची जातीनिहाय आकडेवारी पाहता एकूण १५ पंचायत समित्यांवर १०८ सदस्य निवडून आले. सर्वात अधिक महिला भारतीय जनता पक्षाच्या (३४ महिला) निवडून आल्या. त्यामध्ये सर्वसाधारण गटातून १२, नागरिकांचा मागास प्रवर्गातून १२, अनुसूचित जाती ६ आणि अनुसूचित जमातीतून ४ अशा एकूण ३४ महिला निवडून आल्या. सर्वसाधारण जातीमधून पुरुष १२, नागरिकांचा मागास प्रवर्गातून १०, अनुसूचित जातींमधून ७ आणि अनुसूचित जमातींमधून ८ असे एकूण ३७ पुरुष निवडून आले. त्यामध्ये १८ महिला आणि १५ पुरुष आहेत. सर्वसाधारण गटातून १०, ना.मा.प्र. ९, अनुसूचित जाती ३ आणि अनुसूचित जमातीतून ११ सदस्य निवडून आले. अपक्ष म्हणून केवळ १ महिला सर्वसाधारण गटातून निवडून आली. राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही केवळ एक पुरुष ना.मा.प्रवर्गातून निवडून आला. शेतकरी संघटनेकडून नागरिकांचा मागास प्रवर्गाकडून एक महिला आणि अनुसूचित जातींमधून एक पुरुष निवडून आला. खडसंगी निर्वाचन गणातून सर्वसाधारण वर्गातून भारतीय जनता पक्षाचा एक मुस्लीम उमेदवार निवडून आला.

तक्ता क्र.१२ : चंद्रपूर जिल्हा परिषद विजयी उमेदवार जातनिहाय आकडेवारी

| अ.क्र | पक्ष | सर्वसाधारण | | ना.मा.प्र. | | अनु.जाती | | अनु.जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | ०६ | ०७ | ०५ | ०३ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | १८ | १५ | ३३ |
| २ | काँग्रेस | ०५ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० | १० | २० |
| ३ | अपक्ष | - | ०१ | - | ०१ | - | - | - | ०१ | - | ०३ | ०३ |
| ४ | एकूण | ११ | ११ | ०७ | ०७ | ०५ | ०४ | ०५ | ०६ | २८ | २८ | ५६ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, मार्च १, २०१७)

चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या एकूण ५६ जागांकरिता निवडणूक झाली. त्यामध्ये काँग्रेसचे २० सदस्य निवडून आले. सर्वसाधारण वर्गातून महिला ५, पुरुष ३, नागरिकांचा मागास प्रवर्गातून महिला २, पुरुष ३, अनुसूचित जातींमधून महिला २, पुरुष १ तर अनुसूचित जमातींमधून १ महिला आणि ३ पुरुष असे २० सदस्य निवडून आले. सर्वाधिक ३३ उमेदवार भाजपचे निवडून आले. सर्वसाधारण वर्गातून ६ महिला आणि ७ पुरुष असे १३ उमेदवार, ना.मा.प्र. ५ महिला आणि ३ पुरुष, अनु.जातींमधून ३ महिला आणि ३ पुरुष, अनुसूचित जमातींमधून ४ महिला आणि २ पुरुष असे एकूण ३३ उमेदवार निवडून आले. अपक्षांकडून सर्वसाधारण वर्गातून पुरुष १, ना.मा.प्र. पुरुष १ आणि अनुसूचित जमातींमधून पुरुष १ असे ३ उमेदवार निवडून आले. आवळगाव मुडझा या विभागातून सर्वसाधारण वर्गातून अनुसूचित जातींचा काँग्रेसचा उमेदवार निवडून आला.

तक्ता क्र.१३ : वर्धा जिल्हा परिषद उमेदवार जातनिहाय आकडेवारी

| अ.क्र | पक्ष | सर्वसाधारण | | ना.मा.प्र. | | अनु.जाती | | अनु.जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | ०६ | ०६ | ०५ | ०४ | ०२ | - | ०३ | ०१ | १६ | ११ | २७ |
| २ | काँग्रेस | ०३ | ०४ | ०१ | ०३ | ०२ | ०१ | ०२ | - | ०८ | ०८ | १६ |
| ३ | बसपा | - | ०१ | - | - | - | ०१ | - | - | - | ०२ | ०२ |
| ४ | अपक्ष | ०१ | - | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ५ | रिपाइं आ. | - | - | - | - | ०१ | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ६ | शिवसेना | - | ०१ | - | - | - | - | ०१ | - | ०१ | ०१ | ०२ |
| ७ | रा. काँ. | - | - | ०१ | ०१ | - | ०१ | - | - | ०१ | ०२ | ०३ |
| — | एकूण | १० | १२ | ०७ | ०८ | ०५ | ०३ | ०६ | ०१ | २८ | २४ | ५२ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, सोमवार, २७ फेब्रुवारी, २०१७)



वर्धा जिल्हा परिषदेवर एकूण ५२ उमेदवार निवडून आले. त्यामध्ये भाजप पक्षाच्या सर्वसाधारण वर्गातून ६ महिला आणि ६ पुरुष असे १२ उमेदवार, ना.मा. प्रवर्गातून ५ महिला, ४ पुरुष, अनुसूचित जातींमधून २ महिला आणि अनुसूचित जमातींमधून ३ महिला आणि १ पुरुष अशा २७ जागा निवडून आणण्यात भाजपला यश मिळाले. काँग्रेसच्या १६ जागा निवडून आल्या. त्यामध्ये सर्वसाधारण गटातून ७, ना.मा.प्रवर्गातून ४, अनुसूचित जाती ३, आणि अनु.जमातींमधून २ अशा १६ जागा निवडून आल्या. बसपा २, अपक्ष १, रिपाइं. आ. १, शिवसेना २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस ३ असे एकूण ५२ उमेदवार निवडून आले.

तक्ता क्र.१४ : वर्धा जिल्हा पंचायत समिती विजयी उमेदवार : जातनिहाय आकडेवारी

| अ.क्र | पक्ष | सर्वसाधारण | | ना.मा.प्र. | | अनु.जाती | | अनु.जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | १२ | १३ | ०८ | ०६ | ०६ | ०२ | ०७ | ०४ | ३३ | २५ | ५८ |
| २ | काँग्रेस | ०३ | ०७ | ०६ | ०६ | ०३ | - | ०२ | ०१ | १४ | १४ | २८ |
| ३ | अपक्ष | - | ०३ | ०२ | - | - | - | - | - | ०२ | ०३ | ०५ |
| ४ | रा. काँ. | ०२ | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | ०१ | ०३ | ०३ | ०६ |
| ५ | बसपा | ०१ | - | - | - | - | ०१ | - | - | ०१ | ०१ | ०२ |
| ६ | शिवसेना | ०१ | ०१ | - | - | ०१ | ०१ | - | - | ०२ | ०२ | ०४ |
| | एकूण | १९ | २५ | १६ | १३ | ११ | ०४ | ०९ | ०६ | ५५ | ४८ | १०३ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, सोमवार, २७ फेब्रुवारी, २०१७)

वर्धा पंचायत समितीच्या ८ पंचायत समितीमध्ये एकूण १०३ उमेदवार विजयी झाले. सर्वाधिक ५८ उमेदवार भाजपचे निवडून आले. यामध्ये सर्वसाधारण वर्गातून १२ महिला, १३ पुरुष असे २५, ना.मा. प्रवर्गातून ८ महिला, ६ पुरुष असे १४, अनुसूचित जातींमधून ६ महिला, २ पुरुष असे ८, अनुसूचित जमातींमधून ७ महिला, ४ पुरुष असे ११ उमेदवार निवडून आले. काँग्रेस पक्षामधून सर्वसाधारण वर्गातून ३ महिला, ७ पुरुष असे १० उमेदवार, ना. मा. प्रवर्गातून ६ महिला, ६ पुरुष असे १२ उमेदवार, अनुसूचित जातींमधून ३ महिला आणि अनुसूचित जमातींमधून २ महिला, १ पुरुष असे २८ उमेदवार निवडून आले. अपक्षांमधून ३ पुरुष सर्वसाधारण गटातून आणि ना.मा.प्रवर्गातून २ महिला, सर्वसाधारण वर्गातून ३, ना.मा.प्र. १ पुरुष, अनुसूचित जातींमधून १ महिला, अनुसूचित जमातींमधून २ पुरुष असे एकूण ६ उमेदवार बसपामधून २, शिवसेना सर्वसाधारण वर्गातून १ महिला, १ पुरुष, अनुसूचित जाती १ महिला, १ पुरुष असे ४ उमेदवार निवडून आले.

वर्धा जिल्हा पंचायत समितीच्या काही पंचायत समितीमध्ये खुल्या गटातून महिला निवडून आल्या; तर काही ठिकाणी सर्वसाधारण वर्गातून अनुसूचित जातींचे उमेदवार निवडून आले. आर्वी पंचायत समितीमध्ये अनुसूचित जातींच्या खुल्या गटामधून भाजपची महिला उमेदवार निवडून आली. सेलू पंचायत समितीमध्ये झडशी निर्वाचन गणातून अनुसूचित जमातीसाठी आरक्षण असताना हा खुला गट होता. या गटातून काँग्रेसच्या मसराम सुनंदा नावाच्या महिला निवडून आल्या. याच पंचायत समितीच्या हमदापूर गणातून अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षण असताना सर्वसाधारण वर्गातील वर्षा पाटील या भाजप पक्षातून निवडून आल्या. वर्धा पंचायत समितीमध्ये सावंगी (मे) या गणातून सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित असणाऱ्या गणातून अनुसूचित जातीच्या कविता कांबळे या बसपामधून निवडून आल्या. समुद्रपूर पंचायत समितीमधून गिरड या गणातून सर्वसाधारण वर्गाचे आरक्षण होते. यामध्ये भाजपचे मुस्लीम उमेदवार इस्माईल शेख, रसीद शेख निवडून आले: हिंगणघाट पंचायत समितीमधून नांदगाव या गणामध्ये अनुसूचित जमातींसाठी आरक्षण होते. हा खुला वर्ग होता. यामधून भाजपच्या वैशाली पुरके निवडून आल्या.

तक्ता क्र.१५ : गडचिरोली जिल्ह्यातील पंचायत समितीमधील विजयी उमेदवारांची जातनिहाय आकडेवारी

| अ.क्र. | पक्ष | सर्वसाधारण | | ना.म.प्र. | | अनु.जाती | | अनु.जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | ०९ | ०९ | ०४ | ०२ | - | ०४ | ०६ | ०८ | १९ | २३ | ४२ |
| २ | काँग्रेस | ०२ | ०३ | ०३ | ०४ | ०३ | - | ०६ | ०३ | १४ | १० | २४ |
| ३ | अपक्ष | - | ०२ | ०१ | ०१ | - | - | ०४ | ०१ | ०५ | ०४ | ०९ |
| ४ | रा. काँ. | ०२ | - | ०१ | ०२ | - | - | ०५ | ०२ | ०८ | ०४ | १२ |
| ५ | आ.वि.सं. | ०२ | - | - | - | ०३ | - | ०४ | ०३ | ०९ | ०३ | १२ |
| ६ | शिवसेना | - | - | - | ०१ | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०३ |
| ७ | एकूण | १५ | १४ | ०९ | १० | ०६ | ०४ | २६ | १८ | ५६ | ४६ | १०२ |
| | एकूण | २९ | | १९ | | १० | | ४४ | | १०२ | | १०२ |

(संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र, बुधवार, मार्च १, २०१७)

गडचिरोली जिल्ह्यातील १२ पंचायत समितीच्या एकूण १०२ जागांकरिता निवडणुका झाल्या. वरील तक्त्यामधून सर्वसाधारण, नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इत्यादी गटांमधून निवडून गेलेल्या पक्षानुसार जातनिहाय आकडेवारी स्पष्ट होते. भाजप पक्षाला सर्वसाधारण वर्गातून एकूण १८ जागा मिळाल्या आहेत. त्यामध्ये ९ महिला आणि ९ पुरुष आहेत. ना.मा. प्रवर्गातून एकूण ६ जागा मिळाल्या. त्यामध्ये ४ महिला आणि २ पुरुष, अनुसूचित जातींमधून केवळ ४ पुरुषच निवडून आले; तर अनुसूचित जमातींमधून ६ महिला आणि ८ पुरुष अशा भाजपच्या एकूण ४२ जागा निवडून आल्या. दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस आहे. काँग्रेसकडून एकूण २४ जागा निवडून आल्या. सर्वसाधारण वर्गातून २ महिला आणि ३ पुरुष असे एकूण ५ तर ना. मा. प्रवर्गातून ३ महिला आणि ४ पुरुष असे एकूण ७, अनुसूचित जातींमधून पुरुषच केवळ ३ निवडून आले. अनुसूचित जमातींमधून ६ महिला आणि ३ पुरुष असे एकूण ९ उमेदवार निवडून आले. तिसऱ्या क्रमांकावरील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एकूण १२ जागा मिळाल्या. सर्वसाधारण वर्गातून महिला २ व पुरुष एकही निवडून आला नाही. ना. मा. प्रवर्गातून १ महिला आणि २ पुरुष असे एकूण ३ उमेदवार निवडून आले. अनुसूचित जातींमधून एकही उमेदवार निवडून आला नाही. अनुसूचित जमातींमधून ५ महिला तर २ पुरुष असे एकूण ७ उमेदवार निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आ.वि.सं. (आदिवासी विकास संघटना) ला १२ जागा मिळाल्या. सर्वसाधारण वर्गातून २ महिला, अनुसूचित जातींमधून ३ महिला आणि अनुसूचित जमातींमधून ४ महिला आणि ३ पुरुष असे एकूण ७ उमेदवार निवडून आले; तर भाजपमधून सर्वसाधारण वर्गातून २ महिला, नागरिकांचा मागास प्रवर्गातून १ महिला आणि १ पुरुष असे एकूण २ उमेदवार निवडून आले. अनुसूचित जमातींमधून ४ महिला आणि १ पुरुष असे एकूण ५ उमेदवार निवडून आले.

गडचिरोली जिल्ह्यातील काही पंचायत समित्यांमध्ये खुल्या वर्गातून महिला उमेदवार निवडून आल्या. कुरखेडा पंचायत समितीमध्ये गोठणगाव गणातून अनुसूचित जमातींसाठी आरक्षण होते. यामधून महिलांसाठी आरक्षण नव्हते. मात्र, या गणामध्ये संध्या नैताम या अनुसूचित जमातीच्या महिला निवडून आल्या. त्याचबरोबर आरमोरी पंचायत समितीमध्ये सिर्सी या सर्वसाधारण वर्गासाठी खुल्या असणाऱ्या गणातून बबीता उसेंडी या महिला निवडून आल्या. एटापल्ली पंचायत समितीमध्येही कसनसूर या गणातून अनुसूचित जमातींसाठी खुल्या असणाऱ्या आरक्षणातून बबीता मडावी या महिला उमेदवार निवडून आल्या. अहेरी पंचायत समितीमध्येही अनुसूचित जातीसाठी खुल्या असणाऱ्या वर्गातून वेलगुर या गणासाठी गीता चालूरकर या महिला उमेदवार निवडून आल्या.

**तक्ता क्र.१६ : गडचिरोली जिल्हा परिषदेत विजयी उमेदवारांची जातनिहाय आकडेवारी**

| अ.क्र. | पक्ष | सर्वसाधारण | | ना.मा.प्र. | | अनु.जाती | | अनु.जमाती | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | म. | पु. | |
| १ | भाजप | ०२ | - | ०४ | ०४ | ०१ | - | ०६ | ०३ | १३ | ०७ | २० |
| २ | काँग्रेस | ०३ | ०२ | ०२ | ०२ | - | ०२ | ०१ | ०३ | ०६ | ०९ | १५ |
| ३ | अपक्ष | - | ०१ | ०२ | - | - | - | - | ०३ | ०४ | ०२ | ०६ |
| ४ | रा. काँ. | - | ०१ | - | ०१ | - | - | ०२ | ०१ | ०२ | ०३ | ०५ |
| ५ | आ.वि.सं. | - | ०१ | - | - | ०१ | - | ०३ | - | ०४ | ०१ | ०५ |
| ६ | शिवसेना | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७ | एकूण | ०५ | ०५ | ०८ | ०७ | ०२ | ०२ | १२ | १० | २९ | २२ | ५१ |
| | एकूण | १० | | १५ | | ०४ | | २२ | | ५१ | | ५१ |

(संदर्भ – महाराष्ट्र शासन राजपत्र, मंगळवार, फेब्रुवारी २८, २०१७)

गडचिरोली जिल्हा परिषदेवर सर्वाधिक भाजपचे उमेदवार निवडून आले. वरील तक्त्यानुसार त्यांची जातनिहाय आकडेवारी स्पष्ट होते. भाजप पक्षाचे सर्वसाधारण वर्गातून २ महिला, नागरिकांचा मागास प्रवर्गातून ४ महिला आणि ४ पुरुष असे एकूण ८ उमेदवार, अनुसूचित जातींमधून केवळ एकच महिला निवडून आली. अनुसूचित जमातींमधून ६ महिला व ३ पुरुष असे एकूण ९ उमेदवार निवडून आले. काँग्रेसचे सर्वसाधारण वर्गातून ३ महिला व २ पुरुष असे एकूण ५ उमेदवार, ना. मा. प्रवर्गातून २ महिला व २ पुरुष असे एकूण ४, अनुसूचित जातींमधून केवळ २ पुरुषच निवडून आले. अनुसूचित जमातींमधून १ महिला व ३ पुरुष असे एकूण ४ उमेदवार निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचा सर्वसाधारण वर्गातून केवळ १ पुरुष उमेदवार निवडून आला. ना. मा. प्रवर्ग व अनुसूचित जातींमधून एकही उमेदवार निवडून आला नाही. अनुसूचित जमातींमधून २ महिला व १ पुरुष असे एकूण ३ उमेदवार निवडून आले. आदिवासी विद्यार्थी संघटनेचे एकूण ५ उमेदवार निवडून आले. यामध्ये सर्वसाधारण वर्गातून १ पुरुष, अनुसूचित जमातींमधून १ महिला व अनुसूचित जमातींमधून ३ महिला निवडून आल्या. अपक्षातूनदेखील ६ उमेदवार निवडून आले. सर्वसाधारण मधून १ पुरुष, ना. मा. प्रवर्गातून २ महिला आणि अनुसूचित जमातींमधून ३ पुरुष उमेदवार निवडून आले.

विदर्भ हा महाराष्ट्राच्या ईशान्य दिशेला असणारा प्रदेश. महाराष्ट्राच्या उर्वरित विभागाच्या तुलनेत विदर्भाचा आर्थिक विकास कमी झाला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या मुद्द्यामुळे विदर्भ हा नेहमीच चर्चांमध्ये राहतो. त्याचबरोबर वेगळ्या विदर्भाच्या मागणीमुळेदेखील विदर्भाची नेहमीच चर्चा होत राहते. स्थानिक शासन संस्थांचा हा निवडणूक निकाल पाहता भाजप हा सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष ठरला आहे. या निवडणुकांमधील प्रचाराचा आढावा घेतला तर शेतकऱ्यांची आत्महत्या आणि वेगळ्या विदर्भाची मागणी हे मुद्दे बाजूला राहिले. विदर्भाच्या राजकारणाला नवी दिशा किंवा नवी समीकरणे या स्थानिक शासन संस्थांमध्ये निर्माण झालेली पाहावयास मिळाली.

केंद्रामध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर या पक्षाने ग्रामीण भागाकडे मोर्चा वळविला. पूर्व विदर्भामध्ये २०१२च्या निवडणुकीच्या वेळी विरोधी पक्ष असणाऱ्या भाजप पक्षाने यावेळी मात्र मोठे यश मिळविले. शहरी भागापुरते आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या भाजपने ग्रामीण भागातदेखील प्रवेश केला. जाहिरातींवर अवाढव्य खर्च करत ग्रामीण भागातील मते मिळवण्यात भाजपला यश मिळाले. निवडणुकीच्या आधीच्या नोटाबंदीच्या निर्णयाचा कोणताही परिणाम या निवडणुकीवर झालेला नाही असे दिसते. एकंदरीत शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे भाजपचा विस्तार वाढत आहे, हे या निकालावरून स्पष्ट होते. या आधी संघाने पूर्व विदर्भाच्या ग्रामीण भागात संघटन केले होते. त्याचा थेट फायदा भाजपला झाला.

या स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर गेला. ज्या ठिकाणी काँग्रेसचे वर्चस्व होते, त्या त्या विभागामध्ये भाजपने प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसलाही मोठा पराभव स्वीकारावा लागला आहे. काँग्रेसला काही ठिकाणी आपली जागा स्थिर ठेवता आली असली तरी जनतेने काँग्रेसला नाकारले आहे हे या निवडणुकीच्या निकालावरून पहायला मिळाले.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. विविध पक्षांकडून या मुद्द्याच्या विरोधात जरी बोलले जात असले तरी विविध पक्षांकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना तिकीट वाटप केले गेले. वर्धा जिल्हा परिषदेमध्ये भाजप पक्षाकडून २, काँग्रेसकडून १ अशा ३ उमेदवारांना पक्षांकडून संधी दिली होती. परंतु, या तीनही उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला. चंद्रपूर जिल्हा परिषदेमध्येही गुन्हेगारी प्रतिमा असणाऱ्या चार उमेदवारांना संधी मिळाली होती. यामध्ये काँग्रेस पक्षाकडून १, अपक्ष १ आणि ग्रामसभेचे २ असे ४ उमेदवार होते. ग्रामसभेचा १ उमेदवार वगळता इतर उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला.

निवडणुकीच्या काही महिने आधी मराठा आरक्षणासंदर्भातील मोर्चे सर्व महाराष्ट्रभर निघाले; परंतु, याचा तितकासा प्रभाव पूर्व विदर्भात पाहावयास मिळाला नाही. तेथील शेतकऱ्यांची आत्महत्या आणि वेगळ्या विदर्भाचा मुद्दा हेदेखील मुद्दे ऐरणीवर आले नाहीत. मराठा मोर्चांमुळे काही ठिकाणी भाजपविरोधी भूमिका पुढे आली असली तरी भाजप पक्षाकडून काही ठिकाणी मराठा समाजातील चेहरे पुढे केल्यामुळे हा विरोध कमी झाला. हेच या निकालावरून स्पष्ट होते.

एकंदरीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये भाजप पक्षाला मोठे यश मिळाले आहे. केंद्रामध्ये भाजपने सत्ता मिळवल्यानंतर ग्रामीण भागामध्ये तितकासा प्रभाव वाढला नव्हता. मात्र, या निवडणुकीच्या निकालावरून हे स्पष्ट होते की, शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही भाजप पोहचला आहे. अजूनही ग्रामीण भागात नरेंद्र मोदींच्या प्रभावाची लाट कमी झालेली नाही हेच यातून सिद्ध होते.



# १२

# मराठवाडा : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक

सूर्यकांत गायकवाड

महाराष्ट्र प्रामुख्याने पाच प्रादेशिक विभागात विभागलेला असल्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणाचा अभ्यास करीत असताना वेगवेगळ्या प्रदेशाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला तरच संपूर्ण महाराष्ट्राचा अभ्यास होईल. या अनुषंगाने सदरच्या लेखामध्ये मराठवाड्यातील स्थानिक राजकारणाचा आढावा घेण्यात आला आहे; कारण खऱ्या अर्थाने राजकारण हे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात सूक्ष्मरीतीने होत असते. ज्या पक्षाचा विस्तार हा स्थानिक राजकारणातूनच होतो, तो पक्ष राज्याच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात यशस्वी होतो.

या लेखामध्ये स्थानिक पातळीवरील पक्षीय बलाबल, निवडून आलेल्या स्त्री-पुरुषांची संख्या, कुणबी, मराठा, इतर मागास प्रवर्गातून सत्तेत कशा पद्धतीने सहभागी झाले आहेत, मुस्लीम सदस्य, महिला त्याचबरोबर अनुसूचित जाती व जमाती यांचा सहभाग इत्यादी गोष्टींच्या स्थानिक निवडणुकीतील आकडेवारीवरून विश्लेषण करण्यात आले आहे. त्याचबरोबर घराणेशाहीतून निवडून आलेल्यांची संख्या दर्शविणारा तक्ताही समाविष्ट करण्यात आला आहे.

### मराठवाड्यातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती

हैदराबाद मुक्तीसंग्रामनंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाला, त्यामागे या प्रदेशाचा विकास होईल अशी अपेक्षा होती. परंतु, आजही हा प्रदेश मागासलेला म्हणून ओळखला जातो; कारण हैदराबाद संस्थानात असताना मराठवाड्यातील शिक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. स्वातंत्र्यानंतर तेथील नेतृत्वाने आणि शिक्षण संस्थाचालकांनी विकासासाठी प्रयत्न केले नाहीत यामुळे मराठवाड्यातील सामाजिक व आर्थिक तणाव वाढलेला दिसून येतो. जवळपास ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून आहे. मराठवाड्यामध्ये मराठा समाज अधिक संख्येने असला तरी